# INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTI DISCIPLINARY STUDIES

**Approved by : University Grant Commission (UGC)**

MONTHLY DOUBLE-BLIND PEER REVIEWED REFERRED OPEN ACCESS INTERNATIONAL JOURNAL

www.irjms.in

E-mail : irjms2015@gmail.com irjms.in@gmail.com

Volume - IV Special Issue - I ISSN : 2454-8499 January, 2018

Impact Factor : 1.3599(GIF), 0.679 (IIFS)


## SPECIAL ISSUE ON RECENT TRENDS IN COMMERCE AND ECONOMICS



INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES

IRJMS


Executive Editor
Prof. Tanaji Jadhav

Chief Editor
Dr. Mahendra Avaghade

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
SPECIAL ISSUE ON RECENT TRENDS IN COMMERCE AND ECONOMICS

Vol. 4, Special Issue 11, February, 2018 ISSN (Online): 2454-8499
Impact Factor: 1.3599(GIF), 0.679(IIFS)

**INDEX**


| Sr. No. | Title of Paper and Authors Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | महाराष्ट्र सार्वजनिक नवीन विद्यापीठ कायदा- आव्हाने<br>प्राचार्य डॉ. संजीव लाटे | 1-6 |
| 2 | **"Regional Inequality in India"**<br>*Sawaishikre B. G.* | 7-12 |
| 3 | **A STUDY ON THE AWARENESS, UTILIZATION AND PROBLEMS OF USING KISAN CREDIT CARDS IN KOLHAPUR DISTRICT**<br>*Dr. Anil D. Kolape* | 13-17 |
| 4 | **हरितगृह शेती पद्धती: कृषी विकासाचे नवे पर्व**<br>**(Green House Farming: New Dimension in Agriculture Development)**<br>**प्रा. डॉ.हनुमंत पोपट शिंदे** | 18-22 |
| 5 | **A REVIEW FOR MOBILE COMMERCE**<br>*Dr Shanta.Arakeri.V,[2]PROF. R.L.Nandargi* | 23-25 |
| 6 | **Impact of GST on service Sector in India**<br>*Prof.Dr.Kale Ankush D., Mrs.Kendre Rekha T* | 26-29 |
| 7 | **TRENDS OF PRODUCTION AND PRODUCTIVITY OF AGRICULTURAL SECTOR IN MAHARASHTRA**<br>*Dr. Shivaji N. Zanzurne, Mr. Rajendra M. Ghadage* | 30-35 |
| 8 | 'आर्थिक विकासाच्या प्रादेशिक असंतुलनातील बदलत्या प्रवृत्तींचा अभ्यास'<br>प्रा.सौ.शीतल महाडिक, प्राचार्य डॉ. संजीव लाटे | 36-39 |
| 9 | **E- Banking : Challenges and Opportunities**<br>*Dr. Santosh Subhash Budhwant* | 40-42 |
| 10 | **"Recent Trends In Banking"**<br>*Prof Dr. SASANE ASHOK NAMDEV* | 43-47 |
| 11 | "महाराष्ट्रातील विविध ऊर्जा स्त्रोत आणि त्याचा अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम अभ्यासणे सन 2000 ते 2017"<br>*गायकवाड सोनाली प्रकाश* | 48-49 |
| 12 | **AWARENESS OF CYBER SECURITY POLICY**<br>*Vikram Govind Gawade* | 50-54 |

INTERNATIONALRESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
SPECIAL ISSUEON RECENT TRENDS IN COMMERCE AND ECONOMICS

Vol. 4, Special Issue 11, February, 2018 ISSN (Online): 2454-8499
Impact Factor: 1.3599(GIF), 0.679(IIFS)

# हरितगृह शेती पद्धती: कृषी विकासाचे नवे पर्व

## (Green House farming: New Dimension in Agriculture Development)

**प्रा. डॉ.हनुमंत पोपट शिंदे**

अर्थशास्त्र विभागप्रमुख,प्रितम प्रकाश महाविद्यालय,इंद्रायणीनगर,भोसरी, पुणे-३९.

**गोषवारा (Abstract):**

*हरितगृह शेती पध्दती ही शेती क्षेत्रातील एक क्रांतीकारी वाटचाल असून यामध्ये प्रतिकुल अशा नैसर्गिक परिस्थिवर मात करून कृत्रीम वातावरणात पिकांचे उत्पादन घेतले जाते. कृत्रीम वातावरणात तापमान, आर्द्रता, सूर्यकिरणांची प्रखरता आणि कार्बनडायऑक्साईडची निर्मिती यामुळे पिकांच्या उत्पानाचा दर्जा व गुणवत्तेबरोबरच उत्पादकतेत देखील वाढ घडवून आणता येते. हरितगृह शेतीपध्दतीमुळे पाणी, श्रम व उत्पादन खर्चात बचत होऊन कोणत्याही हंगामात पिकांचे उत्पादन घेणे शक्य झाल्यामुळे शेतकऱ्यांची नफा क्षमता वाढून त्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारणा घडवूण आणता येते. जगातील प्रगत देशांच्या तुलनेत भारतातील हरितगृह क्षेत्र हे अत्यल्प असल्याने देशातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या शेतीपद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे. हरितगृह शेती पद्धतीचे महत्व लक्षात घेता शेती क्षेत्रात अमुलाग्र बदल घडवून आणण्याच्या दृष्टीने या शेती तंत्राचा अभ्यास करणे आवश्यक वाटल्याने प्रस्तुत विषयाची निवड केली आहे. प्रस्तुत लेखात हरितगृह शेतीपद्धतीचा अर्थ, स्वरुप, आवश्यकता व महत्व, हरितगृह शेतीपद्धतीच्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील विकासाचा आढावा, महाराष्ट्रातील हरितगृह शेतीपद्धतीच्या विस्तार या घटकांचे अध्ययन केले आहे.*

**कळीचे शब्द(Key Wards):**हरितगृह शेती, पिके, तापमान, आद्रता, वातावरण, तंत्रज्ञान.

**१. प्रस्तावना(Introduction)**

आर्थिक विकासाबरोबर शेतीक्षेत्रा वरील लोकसंख्येचे अवलंबीत्व कमी होत जाते. परंतू ही अवस्था साध्य करण्यासाठी शेतीच्या क्षेत्राची मदत मोलाची ठरते. जपान सारख्या वेगाने विकसित झालेल्या देशात शेतीने विकास प्रक्रियेला हातभार लावला आहेत. देश विकसीत झाला तरी वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची आणि विविध उद्योगांची कच्च्या मालाची गरज हेच क्षेत्र पूर्ण करते. विकसनशील अर्थव्यवस्थेत तर राष्ट्रीय उत्पन्न, निर्यात, अन्नधान्य आणि कच्या मालाचा पुरवठा, रोजगार, इत्यादी क्षेत्रांमध्ये शेती क्षेत्राची भूमिका महत्वाची असते. विसावे शतक हे आधुनिक शेतीचे युग समजले जाते. या आधुनिक युगात शेतीमध्ये नवनवीन पद्धतीने शेती तंत्राचे शोध लावले जात आहे. या नवनवीन तंत्र पद्धतीचा वापर करुन शेतीमधील उत्पादकता व उत्पन्न देखील वाढत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीत बदल होत आहे. नवनवीन तंत्रज्ञानातील एक पद्धत म्हणजे हरितगृह शेती होय.

**२. अभ्यासाची उद्दिष्ट्ये(Objectives of The Study)**

प्रस्तुत अभ्यासासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित केली आहेत.

१. हरितगृह शेतीपद्धतीचा अर्थ, स्वरुप, आवश्यकता व महत्व स्पष्ट करणे.
२. हरितगृह शेतीपद्धतीच्याआंतरराष्ट्रीयपातळीवरील विकासाचा आढावा घणे.
४. महाराष्ट्र राज्यातील हरितगृह शेतीपद्धतीच्या विस्ताराचा मागोवा घेणे.

**३. संशोधन पध्दती (Research Methodology)**

प्रस्तुत अभ्यासासाठी प्रामुख्याने द्वितीय स्त्रोतांद्वारे प्राप्त झालेल्या माहिती व आकडेवारीचा वापर केला आहे. यासाठी विविध संदर्भग्रंथ, नियतकालिके, गोडवा मासिक,शेतकरी मासिक, महाराष्ट्र शासनाचे हरितगृह शेतीपद्धतीसंबंधीचे विविध शासन निर्णय, वर्तमानपत्रातील लेख, विविध संकेतस्थळे (Websites)या स्त्रोतांमधून संकलित करण्यात आली आहे.